**प्रेसनोट**

दि. ०१/०९/२०२१

# पंचायत समिती हवेली येथील गट शिक्षण अधिकारी व RTE प्रवेश पडताळणी समिती सदस्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७ अ, १२ |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - रामदास शिवनाथ वालझाडे, वय-५० वर्षे, पद - गट शिक्षण अधिकारी, वर्ग -२, पंचायत समिती ता. हवेली जि. पुणे.<br>२) विकास नंदकुमार धुमाळ, वय- ४० वर्षे, पंचायत समिती हवेली कडून शालेय शिक्षण प्रवेशासाठी गठित करण्यात आलेली (RTE) प्रवेश पडताळणी समिती सदस्य (पालक शिक्षक संघाचे प्रतिनिधी) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५०,०००/- (पन्नास हजार रूपये) |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी :- दिनांक - ३१/०८/२०२१<br>सापळा दिनांक :- दिनांक - ०१/०९/२०२१.<br>यातील तक्रारदार यांच्या मुलीचे 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम' (RTE) २००९ अन्वये विसडम वर्ल्ड स्कुल (Wisdom World School) हडपसर पुणे येथे लॉटरी पद्धतीने मिळणाऱ्या प्रवेश यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याकरीता त्याबाबतची कागदपत्रे तपासून प्रवेशासाठी ऑनलाईन मान्यता देण्यासाठी आरोपी क्रमांक २ याने आरोपी क्रमांक १ करिता ५०,०००/- रुपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम हवेली पंचायत समिती कार्यालयाच्या बाहेर स्वीकारली म्हणून दोघांवर बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.<br>तपास विजयमाला पवार, पोलीस उप अधीक्षक ला.प्र.वि. पुणे युनिट या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे,श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४ २. ॲन्टीकरप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.